# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम

## अहवाल

- आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा - आव्हान २०१७ - अक्षय घोपे, आकाश काकडे, स्वराज खवणे यांची निवड करण्यात आली व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर कोल्हापुर युनिर्व्हसिटी येथे घेतले.
- ३० ऑगस्ट २०१७ - रा.से.यो. स्वयंसेवक अतुल राऊत याला विद्यापीठाचा उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार मा. कुलगुरुंच्या हस्ते देवून गौरविण्यात आले.
- सल्लागार समितीची स्थापना व गठन - मा. प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांच्या उपस्थितीत ४ ऑगस्ट रोजी सल्लागार समितीची स्थापना व गठन करण्यात आले. यात नियमित व विशेष शिबीरात घ्यावयाचे कार्यक्रम यावर चर्चा करण्यात आली.
- ६ ऑगस्ट २०१७ - रा.से.यो. उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- ७ ऑगस्ट २०१७ - महाविद्यालयात वृक्षरक्षा बंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वृक्षांना राखी बांधून पर्यावरण संतुलन व झाडे वाचवा याचा संदेश देण्यात आला.
- १ ऑगस्ट २०१७ - महाविद्यालयाचे रा.से.यो. पथकाकडून स्वच्छता या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान यात विद्यार्थ्यांनी मते जाणून घेण्यात आली. विद्यार्थ्यांना प्राचार्यामार्फत स्वच्छता शपथ देण्यात आली.
- २ ते ५ ऑगस्ट २०१७ - या कालावधीत स्वयंसेवकांनी महाविद्यालयीन परिसर तसेच महाविद्यालयाची स्वच्छता केली. महाविद्यालयाच्या वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, महाविद्यालयाचे सभागृह आणि सभोवतालचा परिसर पुर्णपणे साफ करण्यात आला. शौचालय तसेच प्रसाधनगृहाची स्वच्छता सुद्धा करण्यात आली.
- ६ ते १० ऑगस्ट २०१७ - या कालावधीत महाविद्यालयाच्या रा.से.यो. स्वयंसेवकांच्या विविध चमु बनविण्यात आल्या. वर उल्लेखित कालावधीत महाविद्यालय, दत्तक ग्राम सोनाळा येथे एक एक चमु भेट देत होती. घरोघरी जावून स्वच्छतेचे महत्व लोकांना पटवून दिले. गावामध्ये श्रमदानाच्या माध्यमातुन गावातील रस्त्याची साफसफाई तसेच तुंबलेल्या नाल्यांची सफाई करण्यात आली.
- ९ ऑगस्ट २०१७ - क्रांती दिन - शहिदांना आदरांजली वाहून क्रांती दिन साजरा करण्यात आला.
- १३ ऑगस्ट २०१७ - महाविद्यालय नजिक असलेल्या गांधी जवाहर बागेत जावून स्वयंसेवकांनी संपुर्ण बगीचा स्वच्छ केला. बगीच्यात बसण्याच्या जागा, मुलांची खेळण्याची जागा इत्यादी ठिकाणी वाळलेले गवत काढून परिसर स्वच्छ केला. बागेच्या परिसरात असलेले महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांचे पुतळ्याच्या साफसफाई करण्यात

आली. स्थानिक प्रशासनाच्या मदतीने टँकर बोलावून बगीच्यात पुतळे आणि रस्ते स्वच्छ करण्यात आले.

- १४ ऑगस्ट २०१७ - स्वच्छ भारत अभियान पंधरवाड्या अंतर्गत घेतलेले कार्यक्रमा अंतर्गत महाविद्यालयातून रॅली काढण्यात आली. स्वयंसेवक विविध फलक घेवून लक्ष्यवेधी घोषणा देत महाविद्यालयातून मार्गक्रमण करीत तसेच काही स्वयंसेवक रॅलीच्या रस्त्याची साफसफाई करीत पुढे चालत होते. ओला व सुका कचरा या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले.
- १५ ऑगस्ट २०१७ - स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमानंतर वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच सर्व साधारण सभेचे आयोजन करण्यात आले.
- २४ सप्टेंबर २०१७ - रा.से.यो. वर्धापन दिना निमित्त स्वच्छता हीच सेवा अभियान राबविण्यात आले. यात स्वच्छता विषयक माहितीपर पथनाट्य, रॅलीचे आयोजन, निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.
- २ ऑक्टोबर २०१७ - महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांचे जयंती निमित्त महाविद्यालयात स्वच्छता अभियान तसेच रॅलीचे आयोजन करण्यात आले. रा.से.यो. स्वयंसेवकांनी महात्मा गांधी यांची वेशभूषा साकारली व रॅलीचे प्रमुख आकर्षण ठरले.
- २६ नोव्हेंबर २०१७ - संविधान दिन - संविधान दिना निमित्त विद्यार्थ्यांना संविधान प्रिॲम्बल चे सामुहिक वाचन करण्यात आले.
- २ डिसेंबर २०१७ - रेड रिबन क्लबची स्थापना व गठन. महाविद्यालयात व सिव्हील लाईन परिसरात रेड रिबन लावून जनजागृती करण्यात आली.
- १५ डिसेंबर २०१७ - सल्लागार समिती बैठक.
- २२ डिसेंबर २०१७ - स्व.म.गो. जोशी यांचा स्मृतिदिन २४ डिसेंबर या दिनाचे औचित्य साधून २२ डिसेंबर रोजी रक्तदान शिबीर, रक्तगट तपासणी शिबीर व थॅलेसिमीया चाचणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. थॅलेसिमीया सोसायटी अकोला, जिवरसायनशास्त्र विभाग व रा.से.यो. यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामान्य रूग्णालय रक्तपेढी, जिल्हा रूग्णालय यांचे सौजन्य लाभले. यात ५६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. १८० विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी तर २०० विद्यार्थ्यांची थॅलेसिमीया चाचणी करण्यात आली.
- २ जानेवारी २०१८ ते ९ जानेवारी २०१८ - ग्राम सोनाळा येथे निवासी शिबीराचे आयोजन.
- १३ जानेवारी २०१८ - मा. जिल्हाधिकारी यांचे आवाहनाला प्रतिसाद म्हणून दि. १३-१-२०१८ रोजी मोर्णा स्वच्छतेत रा.से.यो. स्वयंसेवकांनी उपस्थिती दर्शविली. नदीत असलेली जलकुंभी तसेच तेथील कचरा विद्यार्थ्यांनी काढून त्याचे व्यवस्थापन केले. या उपक्रमात विविध संस्थांनी सुद्धा आपला सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे या उपक्रमाचे मा. नरेंद्रजी मोदी पंतप्रधान यांनी 'मन की बात' या कार्यक्रमात नोंद घेतली व कौतुक केले.
- २४ जानेवारी २०१८ - वाहतुक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मा. विलास पाटी, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा यांनी मार्गदर्शन केले.
- २५ जानेवारी २०१८ - जागतीक मतदार दिन - जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे मतदार जागृती अंतर्गत महाविद्यालयात

घोषवाक्य, रांगोळी, वादविवाद तसेच निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विजेत्यांना रा.से.यो. तर्फे पुस्तक देवून तर जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे प्रशस्तीपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.

- १ फेब्रुवारी २०१८ ते ८ फेब्रुवारी २०१८ - या दरम्यान विद्यापीठ स्तरीय जिल्हानिहाय श्रम संस्कार शिबीरात कार्यक्रम अधिकारी यांनी क्षेत्रीय समन्वयक तसेच समन्वयक म्हणून कार्य केले.
- ३ फेब्रुवारी २०१८ - मोर्णा नदी स्वच्छतेत रा.से.यो. स्वयंसेवकांचा सहभाग.
- १० फेब्रुवारी २०१८ - महिला कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेविका यांचा मोर्णा स्वच्छतेत सहभाग.
- २३, २४ फेब्रुवारी २०१८ - अकोल्यातील माता नगर येथे घडलेल्या गॅस सिलेंडर स्फोटात तेथील घरे उध्वस्त झाली. यात रा.से.यो. स्वयंसेवकांनी मदत कार्यात मोलाची भूमिका बजावली. शिक्षक वर्ग यांचे सहकार्याने रा.से.यो. स्वयंसेवकांनी जमा केलेल्या निधीच्या सहाय्याने प्रत्येक घरास ५ किलो तांदुळ, एक किलो पिठाचे वाटप केले व भोजनाची व्यवस्था सुद्धा केली.
- ८ मार्च २०१८ - महिला कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेविका यांनी सायकल, स्कूटर रॅलीमध्ये सहभाग नोंदविला.
- २३ मार्च २०१८ - रा.से.यो. समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम अधिकारींनी विस्तृत अहवालाचे वाचन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या अध्यक्षतेत हा कार्यक्रम पार पडला.

**डॉ. सुधीर आर. कोहचाळे**
**डॉ. रश्मी पी. जोशी (सावलकर)**
**डॉ. समाधान एल. मुंडे**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष शिबीर - सोनाळा

# अहवाल

(दि. २ जानेवारी २०१८ ते ९ जानेवारी २०१८)

**दि. २-१-२०१८, मंगळवार :**

दत्तक ग्राम सोनाळा येथे सर्व शिबीरार्थीचे आगमन. शिबीर पुर्व तयारी, गावकऱ्यांशी चर्चा, प्रकल्प पाहणी व श्रमदान पुर्व तयारी करण्यात आली.

**दि. ३-१-२०१८, बुधवार :**

दत्तक ग्राम सोनाळा येथील विशेष शिबीराचे उद्‌घाटन मा. डि.जी. शेखर, प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला यांचे हस्ते झाले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. हेडा हे अध्यक्षस्थानी उपस्थित होते, तर प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि.डी. नानोटी, गावचे सरपंच डॉ. पुरूषोत्तम भटकर व ग्राम पंचायत सदस्य हे उपस्थित होते. उद्‌घाटनपर बोलतांना मा. बी.जी. शेखर यांनी विद्यार्थ्यांनी ध्येयाची आसक्ती ठेवावी व दृढ निश्चयी असावे असे आवाहन केले. डॉ. आर.बी. हेडा यांनी सर्वांगीण विकासात रा.से.यो. उपयोगी ठरत आहे असे सांगितले.

**दि. ४-१-२०१८, गुरुवार :**

सकाळच्या सत्रात प्रार्थना, स्फूर्तिगिते व रॅलीचे आयोजन करण्यात आले. श्रमदाना अंतर्गत शोषखड्‌डा निर्मितीचे कार्य सुरु करण्यात आले. दुपारच्या सत्रात मा.प्रा. महेश डाबरे यांचे ध्येय निश्चिती विषयावर व्याख्यान तर दहशतवाद प्रतिबंधात्मक योजना, मा. तपन कोल्हे व मा. पुनीत कुलट, सहायक पोलीस निरीक्षक, दहशतवाद प्रतिबंधक कक्ष, अकोला यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळच्या सत्रात गमंत जंमत या कार्यक्रमातून सामाजिक बांधीलकी कशी जोपासावी हे हास्यविनोदातून सांगितले.

**दि. ५-१-२०१८, शुक्रवार :**

सकाळी योग प्राणायाम याचे धडे मा. देशमुख सर यांनी दिले आणि सुदृढ आयुष्यावर मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात पर्यावरण संतुलन काळाची गरज या विषयावर डॉ. आय.ए. राजा, विभाग प्रमुख, प्राणीशास्त्र विभाग यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळच्या सत्रात देशभक्तीपर गीताचे आयोजन सिताबाई कला महाविद्यालयाच्या संगीत विभागाने केले.

**दि. ६-१-२०१८, शनिवार :**

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व शासकिय रूग्णालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व औषधी वितरणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या शिबीराचा एकुण ३६० ग्रामस्थांनी लाभ घेतला. याचे आर्थिक मुल्यांकन तपासणीचे व औषधीचे अनुक्रमे रू. १,०८,०००/- व रू. ६०,०००/- याचा लाभ शालेय विद्यार्थ्यांनी तसेच गावकऱ्यांनी घेतला. याच दिवशी मा.डॉ. स्वप्ना लांडे व श्री. धम्मदिप इंगळे यांचे मार्गदर्शनात अंधश्रद्धा निर्मुलन व

वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात अंधश्रद्धा निर्मुलन व जादुटोना कायदा यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. सायंकाळच्या सत्रात मा. वसंतराव मानवटकर लोकशाहीर यांचा विनोदात्मक तुमडी गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात त्यांनी बेटी बचाव, हागणदारी मुक्त गांव, पर्यावरण संतुलन, हुंडाबंदीवर मात, मतदार जागृती या विषयावर उद्बोधन केले.

**दि. ७-१-२०१८, रविवार :**

सकाळी श्रमदाना अंतर्गत शोषखड्डा निर्मिती करण्यात आली. दुपारच्या सत्रात वित्तीय साक्षरता बिटकॉईन या विषयावर प्रा. रूईवाले यांनी मार्गदर्शन केले. आजचा युवक व युवकांचे वाढते व्यसन या विषयावर डॉ. अजय उपाध्याय, गायत्री परिवार हे उपस्थित होते व युवकांना उद्बोधित केले. यावेळी त्यांचे सोबत उपस्थित गायत्री परिवार मंडळींनी व्यक्तिमत्व विकास, योगा व प्राणायाम यावर सुद्धा मार्गदर्शन केले. सायंकाळी जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, अकोला येथील चमु उपस्थित झाली, यात वरीष्ठ व कनिष्ठ स्तर न्यायाधिश तसेच वकिल मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. मोतिसिंहजी मोहता हे होते. यात मान्यवरांनी वैकल्पीक वाद निवारण पद्धती, नागरिकांचे मुलभूत अधिकार, विधी सेवा साक्षरता यावर मार्गदर्शन केले.

**दि. ८-१-२०१८, सोमवार :**

योग प्राणायाम, रॅली, स्फूर्ती गिते तसेच श्रमदाना नंतर एड्स जनजागृती या विषयावर डॉ. यु.के. भालेकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच सायंकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांमध्ये कलागुणांना वाव मिळावा म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात विविध नृत्य, नाट्य, एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.

**दि. ९-१-२०१८, मंगळवार :**

सोशल मिडीया व समाज या विषयावर डॉ. हरिष मालपाणी यांनी युवकांवर होणारा इंटरनेटचा प्रभाव परिणाम यावर मार्गदर्शन केले. तसेच महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यात रानमाजी स्पर्धा घेण्यात आली. तसेच रानभाजी व पोषक तत्वे या विषयावर वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख श्रीमती वैशाली बडगुजर यांनी मार्गदर्शन केले. तीन स्पर्धकांना अनुक्रमे पारितोषिक देण्यात आले. रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी व येथे उपस्थित मान्यवरांनी अन्नातील भेसळ ओळखण्याबद्दल महिलांना मार्गदर्शन केले. ग्राम सोनाळा येथील शालेय विद्यार्थ्यांना पेन, पेन्सील तसेच शालेय वस्तुंचे वाटप करण्यात आले.

शिबीर समारोपीय कार्यक्रमात गावचे सरपंच, कार्यकारीणी सदस्य मा. सत्यनारायणजी बाहेती, तसेच प्राचार्य डॉ. विजय नानोटी हे उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारींनी विस्तृत अहवालाचे वाचन केले. तर मान्यवरांनी शिबीर यशस्वीते विषयी शुभेच्छा दिल्या. सरपंच तसेच गावकऱ्यांनी महाविद्यालयाचे शिबीर आयोजनाकरीता विशेष आभार मानले.

**डॉ. सुधीर आर. कोहचाळे**
**डॉ. रश्मी पी. जोशी (सावलकर)**
**डॉ. समाधान एल. मुंडे**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना